महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

चाळीसगाव व माळेगाव (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे सपाटीकरण करुन त्यांची नोंद त्यांच्या ७/१२ वर केल्याबाबत

(१) १३३९२ (०८-०४-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र भुविकास महामंडळातर्फे प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली मृदसंधारण अधिकारी, जमिन सुधारणा जळगाव यांच्यामार्फत चाळीसगाव पाटबंधारे उपविभागाच्या कार्यक्षेत्रात पाझर प्रकल्प लाभक्षेत्रात चाळीसगाव व माळेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे सपाटीकरण करण्यात आले असून या कामाचा कर्जाचा बोजा सबंधित शेतकऱ्यांच्या ७/१२ रेकॉर्डवर चढविण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज घेण्यास अडचण येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (२३-०५-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पडणाऱ्या दुष्काळ व शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र निधी मिळण्याबाबत

(२) २०५४७ (०६-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थिती हाताळण्यासाठी तसेच दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत देण्यासाठी आकस्मिता निधीत ९०० कोटीची वाढ करण्याचा निर्णय राज्याच्या मंत्री मंडळाने दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी राज्याचा आकस्मिता निधी किती कोटीचा होता व त्यात वाढ करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, साखर उद्योगासाठी शासनाने २००० कोटीचे पॅकेज जाहिर केले असल्याने त्या पॅकेजसाठी लागणा-या निधीचा या वाढीव निधीत समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात पडणारा दुष्काळ व शेतक-यांसाठी स्वतंत्र निधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०५-२०१८) : (१) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या राज्य हिस्यासाठी रु.६३०.७४ कोटी, अवेळी पाऊस गारपीट यामुळे पीक नुकसान बाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी रु.२८१ कोटी व जलयुक्त शिवार कार्यक्रमासाठी रु.५० कोटी असा एकूण ९६२ कोटी इतका निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी मा.मंत्रीमंडळाच्या दि.२७.०५.२०१५ च्या निर्णयानुसार आकस्मिकता निधीत रु.९६२ कोटीची तात्पुरती वाढ करण्यात आली आहे.
(२) महाराष्ट्र राज्याचा आकस्मिकता निधी हा मुंबई आकस्मिकता अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन करण्यात आला असून त्याची कायमस्वरुपी मर्यादा रु. १५० कोटीची असून वरील कारणामुळे त्यामध्ये रु.९६२ कोटीची तात्पुरती वाढ करण्यात आली होती.
(३) नाही.
(४) राज्यात पडणाऱ्या दुष्काळ व शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र निधी उभारला जात नाही. तथापि, दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ महसूल व वन विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात "२२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य" या लेखाशीर्षाखाली निधीची तरतूद करण्यात येते. त्यानुषंगाने सन २०१५-१६ करीता रु.२१६३ कोटी, सन २०१६-१७ करीता रु.५५७१ कोटी व सन २०१७-१८ करीता रु.५५७२ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औरंगाबाद जिल्हा आरोग्य विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या सहा युनानी रुग्णालयांमध्ये डॉक्टर उपलब्ध नसल्याबाबत

(३) ३८९५८ (२१-०१-२०१६). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे युनानी रुग्णालयामध्ये एक ही डॉक्टर सेवेत नसताना दरवर्षी औषधे खरेदी केली जाते तसेच स्थानिक निधी लेखा विभागाने केलेल्या ऑडीटमध्ये या बाबींवर ऑडिटरने आक्षेप नोंदवल्याची बाब माहे जुलै व ऑक्टोबर, २०१५ मध्ये निष्पन्न झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील औषधे खरेदीबाबत आरोग्य विभागाने रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी फार्मासिस्टकडून उपचार केले जातात असे लेखी स्पष्टीकरण आरोग्य विभागाला दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा आरोग्य विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या सहा युनानी रुग्णालयांमध्ये मेडकिल ऑफिसरचे एक पद मंजूर असताना तसेच डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डॉक्टर उपलब्ध नसताना रुग्णालयाच्या नावाने औषध खरेदी करुन फॉर्मासिस्ट रुग्णांवर उपचार करीत असल्याने रुग्णाच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने याबाबत चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०४-२०१८) : (१) अंशत: खरे आहे, औरंगाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत सहा युनानी वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजूर असून यापैकी ४ पदे राजीनामा/सेवानिवृत्तीमुळे रिक्त आहेत.
(२) खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे. सहा युनानी रुग्णालयापैकी प्रत्येक रुग्णालयामध्ये आठवड्यातून दोन दिवस काम पाहण्याबाबत कार्यरत असलेल्या दोन युनानी वैद्यकीय अधिकारी यांना आदेशीत करण्यात आले आहे.
(४) औरंगाबाद जिल्हा परिषद अंतर्गत मंजूर ६ युनानी वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४ पदे रिक्त आहेत. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून औषध निर्माण अधिका-यांमार्फत उपचार करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत किमान ३x३०x३ मी. आकारमानाचे शेततळे तयार करण्याची परवानगी देण्याबाबत

(४) ४२३९३ (३०-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीकडून १५x १५x३ मी. आकारमानाचे शेततळे तयार करण्याची परवानगी दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्लेखित आकारमानाचे शेततळे अत्यंत लहान व उपयोग क्षम नसल्यामुळे किमान ३x३०x३ मी आकारमानाचे शेततळे तयार करण्याची परवानगी ग्रामपंचायतीला देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयातील अनेक तालुके सतत दुष्काळग्रस्त असून तेथील सिंचन सुविधा वाढविणे आणि तेथील मजुरांना तत्परतेने काम उपलब्ध करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२४-०४-२०१८) : (१) होय.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळयांची कामे ग्रामपंचायत/ यंत्रणामार्फत घेण्यास शासन निर्णय दिनांक १४ सप्टेंबर,२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीमार्फत छोट्या आकारमानांच्या शेततळ्यांची कामे (१०X१०X३मी., १५X१०X३मी., व १५X१५X३ मी.) अनुज्ञेय आहेत.
(२) शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०१६ अन्वये ३०X३०X३ मी. आकारमानाचे शेततळे घेण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.
(३) व (४) दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर "मागेल त्याला शेततळे" ही योजना शासनाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे महात्मा गांधी नरेगाअंतर्गत शेततळ्यांची कामे अनुज्ञेय आहेत. सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यांमध्ये कामांचे शेल्फ तयार ठेवण्यात आले असून, कामाची मागणी होताच कामे उपलब्ध करून देण्याची तजवीज करण्यात आली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत ज्या शेतकऱ्यांनी शासकीय अनुदानासाठी स्वखर्चाने विहिरी खोदल्या आहेत त्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत

(५) ५३६४० (२९-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनूसुचित जाती-जमाती तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत तीन लाखापर्यतच्या अनुदानावर सिंचन विहिरी खोदण्याचा धडक कार्यक्रम २०१४-१५ शासनाने हाती घेतला असुनही काही मोजकीच कामे सोडली तर ही योजना अनुदानाच्या टप्प्यावर प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद, उमरगा, परंडा आणि लोहरा या तालुक्यात मनरेगांतर्गत मंजूर झालेल्या १,३३६ विहिरीपैकी ९१३ विहीरी पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले परंतु प्रत्यक्षात अनेक विहिरी केवळ कागदोपत्रीच पूर्ण असल्याचे या पाहणीतून दिसत आहे तसेच जी कामे प्रगतीपथावर आहेत असे सांगण्यात आली त्याची प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सिंचन विहिर योजनेची वस्तूस्थिती कळताच बीड, उस्मानाबाद,लातूर,परभणी जिल्हा प्रशासनाने विहिरीच्या कामाची चौकशी करण्याकरीता सुरुवात केल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या तिसऱ्या वा चौथ्या आठवडयात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या जिल्हयांमध्ये अनेक ठिकाणी बनावट विहिरींना मंजूरी देण्यात येणे, लाभार्थ्यांनी कर्ज काढून विहीरीची कामे पूर्ण केली असता त्यांना अनुदान न मिळणे, रोहयो विभागातील अकुशल व कुशल कामगारांचे निधी उपलब्ध नसल्यामुळे लाखो रुपयांचे देणे थकीत असल्याचे निदर्शनास आले तसेच चार हजार विहिरींच्या देयकाबाबत स्पष्टीकरण उपलब्ध न होणे इ. अनेक गैरप्रकार या केलेल्या पहाणीमध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१४-१५ व २०१५-१६ या काळात विविध योजना अंतर्गत विहिरींना देण्यात आलेली मंजुरी व २०११-२०१४ या काळात देण्यात आलेल्या मंजुरीपैकी अपूर्ण राहिलेली विहिरीची कामे याबाबतचा तपास पूर्ण न झाल्याने नेमक्या किती विहिरी म.न.रे.गा. अंतर्गत या चार ते पाच जिल्हयात पूर्ण झाल्या आहेत याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(६) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत ज्या शेतकऱ्यांनी शासकीय अनुदानासाठी स्वखर्चाने विहिरी खोदल्या आहेत त्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. जयकुमार रावल (२४-०४-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

तथापि, कामाच्या मागणीनुसार सिंचन विहरींची कामे हाती घेऊन खोदकामाची (अकुशल) अदाई मजुरांच्या वैयक्तिक खात्यावर व बांधकाम (कुशल) देयकेही ग्रामपंचायतीच्या खात्यावर वर्ग करुन ही कामे पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येते.

(६) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील सिंचन विहिरी ही वैयक्तिक लाभाची योजना असून अनुदान तत्वावर आधारित नसल्याने शेतकऱ्यांना अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जिल्हयातील शेती रस्त्याचा प्रस्ताव मंजूरीअभावी प्रलंबित असल्याबाबत

(६) ५४७९८ (२८-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतक-यांचे आर्थिक नफा होवून शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शेती रस्त्यांचा विषय गेल्या पाच वर्षापासून केंद्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्हयातील १ हजार १११ कि.मी च्या शेती रस्त्यासाठी १०९ कोटींचा प्रस्ताव पूर्ण होण्यासाठी विलंब लागत असल्याने जिल्हयातील सुमारे १४८७ गावामधील दीड हजार शेती रस्ते अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूरीअभावी प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत याबाबत शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (१०-०४-२०१८) : (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये अपेक्षित मनुष्यदिन निर्मितीच्या अनुषंगाने वार्षिक कृती आराखडा तयार केला जातो व त्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावरुन अनुज्ञेय कामांचा समावेश आराखडयामध्ये करण्यात येतो. परंतु या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडे स्वतंत्र प्रस्ताव पाठविण्याची तरतूद नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, ग्रामपंचायत स्तरावर मंजूर कृती आराखडयाप्रमाणे शेत जोड रस्त्यांची कामे शेल्फवर घेण्यात आली असून मजुरांच्या मागणीप्रमाणे कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सन २०१४-१५ ते आजतागायत ग्रामपंचायत स्तरावर एकूण ४१६ कामे पुर्ण करण्यात आली असून त्यासाठी रु.३५०१.४४ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

बोईसर (जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या कामात झालेला गैरव्यवहार

(७) ६६८५२ (२७-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सरपंच व उपसरपंच या दोघांनी बोईसर ग्रामपंचायतीच्या दिनांक १८ जुलै, २०१६ पूर्वीच्या कालावधीमधील झालेल्या व्यवहारामध्ये अनियमितता, चुकीच्या पध्दतीने केलेली कामे आणि आर्थिक गैरव्यवहार याबाबत स्पेशल ऑडीट करण्याची लेखी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

पालघर यांचेकडे माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामपंचायतीचे वरिष्ठ लिपिक यांनी लक्ष्मण कॉम्प्लेक्स कडून आलेल्या निधीची कॅशबुकामध्ये नोंद न करता तो निधी रस्त्यांच्या कामासाठी खर्च केला तसेच अस्तित्वात नसलेल्या झेरॉक्स कॉपीचे, ग्रामपंचायतीच्या दोन सायकलीच्या दुरुस्तीचे व वृत्तपत्रात दिलेल्या जाहिराती इत्यादीवर लाखो रुपयांचा खर्च दाखविण्यात आला असून कायम सफाई कामगार असतांनाही अनेक अतिरिक्त कामगार कंत्राटी पध्दतीने दाखविले, तसेच सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचे वॉऊचर सरपंच व ग्रामविकास यांनी अधिका-यांची सही न घेता वापरले असून दिनांक १० ऑगस्ट,२०१६ रोजी वा त्यासुमारास त्यांना चौकशी काळात नोकरीवरुन निलंबित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यासाठी बोईसर ग्रामपंचायतीच्या मागील कार्यकाळातील स्पेशल ऑडिट करण्याची मागणी नवनिर्वाचित बोईसरच्या सरपंच व उपसरपंच यांनी पालघर जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे दिनांक २५ जुलै,२०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व तद् नुसार संबधित कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१८) : (१) (२) (३) व (४) पालघर जिल्ह्यातील बोईसर ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सरपंच व उपसरपंच यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे बोईसर ग्रामपंचायतींमध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराचे स्पेशल ऑडिट करण्याची मागणी केलेली आहे. तथापि सदर मागणी लेखी निवेदनाद्वारे केलेली नसून तोंडी मागणी केलेली आहे. सदरची तोंडी मागणी करण्यापूर्वीच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर कार्यालयाने त्यांच्या दि.९.११.२०१५ च्या पत्रान्वये बोईसर ग्रामपंचायतीच्या दि.०१.०४.२०१० ते ३१.०३.२०१५ या कालावधीच्या विशेष लेखा परीक्षणाची मागणी स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई यांचेकडे केली होती. त्यानुषंगाने स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर कार्यालयाने त्यांच्या दि.३१.०३.२०१६ च्या पत्रान्वये, बोईसर ग्रामपंचायतीच्या सन २०१० पासूनच्या सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, ठाणे/ पालघर यांनी केलेल्या लेखापरिक्षणाचे अहवाल उपसंचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांना पाठविले आहेत.

बोईसर ग्रामपंचायतीचे वरिष्ठ लिपिक श्री.संतोष मराठे यांनी लक्ष्मण कॉम्प्लेक्स कडून आलेल्या निधीची कॅश बुकामध्ये नोंद न करता तो निधी रस्त्याच्या कामासाठी खर्च केला. त्यामुळे विद्यमान सरपंच, ग्रामपंचायत, बोईसर यांनी त्यांच्या दिनांक ११/०८/२०१६ रोजीच्या आदेशान्वये श्री.संतोष मराठे यांना निलंबित केले होते.

श्री. मराठे यांना निलंबित करताना सरपंच, ग्रामपंचायत, बोईसर यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ६१ (१) नुसार ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन कार्यवाही न केल्यामुळे श्री. मराठे यांनी सदर निलंबन आदेशाविरूद्ध केलेले अपिल मान्य करण्यात आले. त्यामुळे श्री.मराठे यांना पुन:स्थापित करण्यात आले.

तद्नंतर श्री.संतोष मराठे , लिपिक यांना ग्रामपंचायतीने विविध मुद्द्यांवर मागविण्यात आलेला खुलासा अमान्य करून ग्रामपंचायत मासिक सभा दि.२८/६/२०१७, ठराव क्र.४०/१० अन्वये ग्रामपंचायतीच्या दि.७/७/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. सदर बडतर्फीच्या आदेशाविरूद्ध श्री.मराठे यांनी २१/९/२०१७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती पालघर यांचेकडे अपिल दाखल केले असून त्यावरील निर्णय प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यशासनाने अधिकचा निधी उभारण्यासाठी शासकीय जमीन विक्री व तारण ठेवण्याचा घेतलेला निर्णय

(८) ६९३४८ (२४-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासन विकास कामांसाठी अधिकचा निधी उभारण्यासाठी शासकीय जमीनीच्या लिलावातून व तारणातून दोन लाख कोटी उभारणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यादरम्यन निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी धोरण ठरविण्यासाठी राज्य शासनाने समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने शासकीय जमिनी विक्री व तारण ठेवण्याबाबत शासनास दिलेल्या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०३-२०१७) : (१) व (२) नाही.

पायाभूत सुविधांचा विकास जलदगतीने होण्यासाठी विभागाच्या ताब्यात असलेल्या जमिनींचा अधिक परिणामकारकपणे करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी समितीची स्थापना दि.३.९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

(३) व (४) समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्हयातील तलासरी ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत केलेल्या कामाची मजुरी मजुरांना देण्याबाबत

(९) ७१५४९ (१६-१२-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील तलासरी ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत केलेल्या कामाची मजुरी मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी समवेत मजुरांचा दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास तलासरी तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद् नुसार मजुरांना मजुरी देण्याबाबत व मजुरांचे वेतन प्रलंबित ठेवणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२८-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रलंबित देयकांबाबत चौकशी करण्यात आली असून चौकशीत देयके देणे बाकी असल्याचे निदर्शनास आले. शासन निर्णय दि. ७ मे, २०१६ च्या आदेशान्वये तलासरी ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये झाल्याने ग्रामपंचायत असतानाच्या कालावधीतील मजुरी देयके कोणी अदा करावी याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविले होते. मार्गदर्शन प्राप्त होताच मजुरी देयके अदा करण्यात आलेली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयातील नायगाव पंचायत समिती वर्ग करण्यात आलेल्या मुद्रांक शुल्क अनुदानाच्या निधीचा अपहार केल्याबाबत

(१०) ७२१६४ (२७-०१-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ सालात नांदेड जिल्हयातील नायगाव पंचायत समिती वर्ग करण्यात आलेल्या मुद्रांक शुल्क अनुदानाचे ९० ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक ते उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संगनमताने १९ लाख ४६ हजार रुपये निधीचा अपहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांकडूनच चौकशी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०४-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) चौकशी अहवालानुसार श्री.डि.व्ही.जोगपेठे विस्तार अधिकारी (पंचायत) यांना दि.१९/७/२०१६ रोजी निलंबित करुन त्यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली आहे.

तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागा अंतर्गत बेघर लाभार्थींना घरकुल देण्याचा प्रस्ताव छाननी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(११) ७४३९५ (१४-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातंर्गत ४०० बेघर लाभार्थ्यांना घरकुल देण्याचा प्रस्ताव छाननी अभावी प्रलंबित असल्याने योजनेचे लाभार्थी लाभापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरकुल योजनेसाठी एकूण १ हजार ३१६ लाभार्थ्यांचे प्रस्ताव आले असून या प्रस्तावांची अद्याप छाननीच न झाल्याने योजेनेचे लाभार्थी लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदरची योजना वेळेत न राबविल्यास निधी परत जाणार असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२३-०४-२०१८) : (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राजापूर (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील धाऊलवल्ली येथून सोलगांव या गावाला जोडणा-या पाणंद रस्त्याला मंजुरी देवूनही काम प्रलंबीत असल्याबाबत

(१२) ८०४५८ (१५-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये राजापूर (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील धाऊलवल्ली येथून सोलगांव या गावाला जोडणा-या पाणंद रस्त्याला मंजुरी देण्यात आली होती मात्र येथील जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग कार्यालयाच्या मनमानी

कारभारामुळे या रस्त्याला अद्याप सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम सुरू न केल्यामुळे सुमारे ५० महिला कामगारांना काम उपलब्ध करून दिले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू प्रकरणी संबंधीत कंत्राटदार व अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२२-०५-२०१८) : (१) होय, अंशत: खरे आहे.

दिनांक २१ जानेवारी,२०१७ रोजी धाऊलवल्ली ते सोलगाव या गावाला जोडणा-या पाणंद रस्त्याचे काम सुरु झाले असून ४ हजेरीपत्रकावर एकत्रित रु.५८,४९२/- इतका खर्च झालेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर कामावर ३२ महिला व १२ पुरुष अशा एकूण ४४ मजूरांनी कामाची मागणी केली होती. त्यांना पुढील कालावधीत त्याच गावातील व्हर्मी कंपोस्ट, नॅडेप कंपोस्ट, गाळ काढणे व फळझाड लागवड या कामांवर त्यांच्या मागणीनुसार काम उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) व (४) होय.

गटविकास अधिकारी पंचायत समिती, राजपूर यांच्याकडून संबंधितांना नोटीस काढण्यात आली आहे. तसेच सदरचे काम संबंधित यंत्रणेकडून पूर्ण करण्यात येत असून काम अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हापरिषदेकडे अपंगाच्या कल्याणासाठी व पुनर्वसनासाठी तरतुद केलेल्या अखर्चीत निधीबाबत

(१३) ८०६६६ (१४-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हापरिषदेकडे अपंगाच्या कल्याणासाठी व पुनर्वसनासाठी स्वउत्पन्नातील सन २०१३-१४ मधील ५२ लाख २ हजार रुपये आणि सन २०१४-१५ मधील ४० लाख ४८ हजार अशी एकूण ९२ लाख ५० हजार रुपयांची तरतूद अदयापी अखर्चित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठया प्रमाणावर रक्कम अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत व यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०४-२०१८) : (१) होय.
(२) व (३) होय. तत्कालीन समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड या अधिकाऱ्यांकडून सदर रक्कम अखर्चीत राहिलेली असून त्यांचे विरूध्द प्रशासकीय कारवाई सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीने पाणीपट्टी ग्रामस्थांकडून वसूल झालेली असतांनाही ग्रामस्थांना नोटीसा दिल्याबाबत

(१४) ८६०७२ (१८-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीने सन २००३ पासून १०० टक्के पाणीपट्टी वसूली असल्याचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १०० टक्के पाणीपट्टी ग्रामस्थांकडून वसूल झालेली असतांनाही ग्रामस्थांना नोटीसा बजाविण्यात आल्याची तक्रार ग्रामस्थांनी दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास गटविकास अधिकारी व मा.मुख्यमंत्र्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२७-०४-२०१८) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालवण यांनी १०० टक्के वसुली अहवाल सादर केलेबाबत तत्कालिन व विद्यमान ग्रामसेवक यांना नोटीसा देवून, त्यांचे खुलासे मागविले आहेत.

कोरेगाव (जि.सातारा) पाणीपुरवठा अधिक्षक पदावर असलेल्या अधिका-यांने अनधिकृत नळजोडण्या देऊन केलेला गैरव्यवहार

(१५) ८७००३ (२१-०८-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगाव (जि.सातारा) ग्रामपंचायत असतांना तेथील पाणीपुरवठा अधिक्षक पदावर असलेले नितीन सावंत यांनी अनधिकृत नळजोडण्या देऊन मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला असून यासंदर्भात त्यांचेविरुध्द चौकशी करुन ते दोषी आढळल्यामुळे त्यांना निलंबित करण्यांत आले होते, हे खरे आहे काय,

(२) तसचे कोरेगाव ग्रामपंचायतीला नगर पंचायतचा दर्जा मिळाल्यानंतर नितीन सावंत यांना मुख्याधिकाऱ्यांनी पदोन्नती माहे मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०४-२०१८) : (१) नाही.

कोरेगाव ग्रामपंचायतीकडील सन २००५ मध्ये दि.२६ जानेवारी च्या प्रशासक ग्रामसभेत ठराव क्रमांक-४(९) ने १८२ जणांना अनधिकृत (बोगस) नळपाणी पुरवठा कनेक्शन दिलेबाबत संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्यावर कारवाई व्हावी असा ठराव करण्यात आला आहे. तथापि बोगस नळ कनेक्शन धारकाची यादी व त्यांना ज्या कर्मचाऱ्यामार्फत कनेक्शन मिळाली त्याचा उल्लेख ठरावामध्ये दिसून येत नाही. त्यामुळे गैरव्यवहार झाला किंवा कसे याची पडताळणी पंचायत समिती कोरेगाव येथील अधिकाऱ्यांना करता आलेली नाही. ग्रामपंचायत कर्मचारी श्री.नितीन सावंत यांचेविरुध्द यासंदर्भात चौकशी केल्याचे अथवा ते दोषी आढळल्याचे ग्रामपंचायतीकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

(२) दि.५ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयाने कोरेगाव ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झाले असून कोरेगाव नगरपंचायतीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या सोईकरीता कर्मचाऱ्यांच्या कामकाजामध्ये बदल करण्यात आले आहेत. श्री.नितीन सावंत यांना पद्दोन्नती देण्यात आलेली नसून कामकाजाच्या सोईनुसार कार्यभार सोपविण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.पुणे) तालुक्याच्या पश्चिम भागात पवनचक्या उभ्या केलेल्या जागेचा कंपनीने कर न भरल्याबाबत

(१६) ८८४६० (११-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्याच्या पश्चिम भागात वर्ल्ड वाईड कंपनीने (पूर्वीची इनरकोन) कंपनीने पवनचक्या उभ्या केलेल्या जागेचा संबंधित ग्रामपंचायतीचा कर भरणे आवश्यक असतानाही अनेक वर्षे कर भरलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार कर न भरणाऱ्या उक्त कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०३-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) मे. विन्ड वर्ल्ड इंडिया लि. या कंपनीचा पवनऊर्जा निर्मिती प्रकल्प असून खेड पंचायत समितीतील ११ ग्रामपंचायतींच्या हद्दीत एकूण ६९ पवनचक्क्यांचे मनोरे सन २०११-१२ पासून अस्तित्वात आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील तरतुदीनुसार पवनचक्की मनोऱ्यांवर मालमत्ता कर आकारणी करण्यात येते व पवनचक्की मनोऱ्यांकरिता करांची कमाल रक्कम ही रूपये १५,००० प्रती मेगावॅट आहे.

सदरील कंपनीकडे या ११ ग्रामपंचायतींनी सन २०११-१२ पासून पूर्वलक्षीने सन २०११-१२ ते २०१७-१८ अखेर एकूण रूपये ५७,००,०००/- इतकी कराची मागणी केली आहे. या करापैकी रूपये २७,७२,०००/- एवढी कराची वसुली पाच ग्रामपंचायतींकडून झाली आहे. उर्वरित सहा ग्रामपंचायतींकडून उर्वरित कराची रक्कम रूपये २९,२८,०००/- वसुल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

प्रस्तुत प्रकरणी पवनचक्की मनोऱ्यांवर कर आकारणी केली नाही म्हणून संबंधित सहा ग्रामसेवकांवर एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्यात आल्याबाबतची कारवाई करण्यात आली आहे.

नंदोरा (जि.भंडारा) येथे रोजगार हमी योजनेच्या कामावर जेसीबीचा वापर होत असल्याबाबत

(१७) ८९४७८ (१९-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत बरीच कामे झाली आहेत परंतु अनेक ठिकाणी बनावट काम झाल्याचे दिसून येते तर काही ठिकाणी बनावट मजूर दाखविण्याचे अनेक प्रसारमाध्यमांच्या आधारे स्पष्ट होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा तालुक्यातील नंदोरा येथे रोजगार हमी योजनेची कामे मंजूर झाली असून ती कामे जेसीबी मशीनच्या सहायाने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रोजगार हमी योजनेच्या कामावर जेसीबीचा वापर करणाऱ्या अधिकारी/ पदाधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (०३-०४-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील शाळांना सोलर यंत्रणा बसविण्याबाबत

(१८) ९१९७१ (२१-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला सन २०१६-१७ मध्ये मिळालेल्या सेस फंडातील दोन कोटी ९८ लाख रुपयांच्या शिल्लक रकमेतून जिल्ह्यातील शाळांना सोलर यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गत आर्थिक वर्षात याच कामासाठी दोन लाख रुपयांची तरतूद केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२३-०४-२०१८) : (१) होय.

(२), (३) व (४) सन २०१६-१७ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना ई-लर्निंग व सोलार युनिट साहित्य पुरवठा करणेसाठी रु. २ कोटी तरतूद करण्यात आली होती. तांत्रिक कारणास्तव सदर योजनेची निविदा प्रक्रिया प्रलंबित आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाने ओबीसी संवर्गातील जाती क्रिमीलेअरच्या तत्वामधून वगळणार असल्याबाबत

(१९) ९६५२५ (०८-०१-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य शासनाकडे सादर केलेल्या अहवालात इतर मागास प्रवर्गातील जाती क्रिमीलेअरच्या तत्वामधून वगळता येऊ शकेल अशी शिफारस केलेला अहवाल सादर केलेला असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिफारशीवर अमलबजावणी करण्यासाठी शिफारसी संदर्भातील हरकती आणि सुचना शासनाने संकेत स्थळावर मागितल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मुद्यांवर ओबीसी संघटनामध्ये अंसतोषाचा वणवा पसरत असून शासनाने ओबीसीच्या सर्व जातींच्या बाबतीत एकच निर्णय घेवून नॉन क्रिमिलेअरची असंवैधानिक अट सरसकट रदद करावी, अशी मागणी ओबीसी महासंघानी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ओबीसीच्या सर्व जातींच्या बाबतीत एकच निर्णय घेवून नॉन-क्रिमिलेअरची असंवैधानिक अट सरसकट रदद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (१६-०५-२०१८) : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) राज्य मागासवर्ग अयोगाच्या सदरहू शिफारशीवर जनतेच्या सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना आणि विजाभज, इमाव व विमाप्र या सर्व प्रवर्गाच्या घटकांना क्रिमिलेअर तत्वातून वगळता येईल किंवा कसे, याबाबतचा अहवाल दि.२०.११.२०१७ च्या पत्राव्दारे राज्य मागसवर्ग आयोग यांचेकडुन मागविण्यात आलेला आहे, सदर अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्राप्रमाणेच राज्यातही क्रिमी लेअरची मर्यादा वाढविण्याबाबत

(२०) ९६६०६ (०६-०१-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने केंद्रीय नोकऱ्यांमधील आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी इतर मागासवर्गीयांकरिता असलेली क्रिमीलेअरंची मर्यादा ६ लाखावरुन ८ लाख करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने क्रिमीलेअरची मर्यादा ६ लाख रुपये ठेवली असून वाढत्या महागाईचा विचार करता वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ८ लाख करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा, लोकप्रतिनिधींनी आणि अनेक इतर मागासवर्गीय संघटनानी निवेदनाव्दारे क्रिमीलेअरची मर्यादा ८ लाख रुपये करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (१६-०४-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) क्रेंद्र शासनाने इतर मागासप्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती /गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी दि.१३.९.२०१७ च्या ऑफिस मेमोरंन्डम नुसार उत्पन्न मर्यादेत वाढ करुण ती रु ८ लाख वार्षीक करण्यात आली आहे त्या अनुषगाने राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती / गट या करीता नॉनक्रिमिलेअर साठी उत्पन्न मर्यादा रु.६.०० लक्ष वरुन रु.८.०० लक्ष इतकी वाढ करण्यास विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग शासन निर्णय क्र.सीबीसी -१०/२००८/प्र.क्र.६९७/ विजाभज-१ दि.१६ डिसेंबर, २०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या बँक खात्यातून सेवाकर दंड म्हणून रक्कम वजा केल्याबाबत

(२१) ९८२१५ (०६-०१-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीनाका, चेंबूर, मुंबई येथील माहूलरोड बँक पालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा झिरो बॅलन्स बचत खात्यातून पाच हजार रुपयांपेक्षा कमी बॅलन्स असल्यामुळे प्रत्येक महिन्याला त्यांच्या जमा रकमेमधून पैसे वजा केले जात आहेत असे दिनांक १४ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसबीआय बँक माहूल रोड शाखेचे व्यवस्थापक विश्वेश्वर मिश्रा यांनी कमी बॅलन्स असलेल्या खात्यातून प्रत्येक महिन्याला वजा केलेले सेवाकर दंड आकारलेली रक्कम मुलांना परत मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलांचे वजा केलेले पैसे त्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०४-२०१८) : (१) व (२) होय.

(३) अयोध्यानगर, महानगरपालिका मराठी शाळा, वाशीनाका, चेंबूर या शाळेने २०० विद्यार्थ्यांची यादी असल्याचे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात ३४ खात्यांची यादी दिलेली असून विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणखी २ खात्यांची माहिती दिली आहे. एकूण ३६ (३४+२) विद्यार्थ्यांच्या खात्यांमध्ये वजा केलेली सेवाशुल्काची रक्कम जमा करण्यात आली आहे. बाकी खात्यासंबंधी शाळेबरोबर पाठपुरावा चालू असून यादी मिळताच मुलांचे पैसे तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्यात येतील, असे राज्यस्तरीय बँकर समिती, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील इ.पी.एस. कर्मचा-यांना देण्यात येणारे
निवृत्तीवेतन वाढविण्याबाबत

(२२) ९९३३५ (०२-०१-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इ.पी.एस. कर्मचा-यांचा शासनाच्या सेवेत असतांना त्यांच्या पगारातून झालेल्या कपातीतूनच देण्यात येणारे निवृत्तीवेतन हे कमी असल्यामुळे या पेंशनमध्ये वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) इ.पी.एस योजना खाजगी आस्थापनात काम करणाऱ्या कर्मचारी यांना लागू असून, ही पूर्णता केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अखत्यारीतील बाब आहे. त्यामुळे सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून कार्यवाही अपेक्षित नाही. याबाबत परस्पर श्रम व रोजगार मंत्रालय, केंद्रशासन यांचेबरोबर पत्रव्यवहार करण्याबाबत मा.विधानसभा सदस्यांना दिनांक १३/०४/२०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये मा.मंत्री महोदयांच्या स्तरावरून कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौ. सांगवी उमर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील मांजरा नदीकाठालगत संरक्षण भिंत बांधण्याबाबत

(२३) १००१३८ (०२-०१-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.सांगवी उमर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील मांजरा नदी काठालगत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खचून जाऊन होणारे नुकसान टाळण्यासाठी नदीकाठालगत संरक्षण भिंत बांधण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, गोदावरी व मराठवाडा विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडून दिनांक २४ मार्च,२०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मागविला आहे, हे खेर आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावानुसार मांजरा नदीकाठालगत संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२६-०३-२०१८) : (१) होय.
(२) सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

स्वयंरोजगार योजनाविषयी राष्ट्रीयकृत बँकांच्या कारभाराबाबत

(२४) १०१४८७ (०६-०१-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनातर्फे युवकांना अनेक शासकीय योजनाच्या माध्यमातून राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्जाच्या स्वरूपात आर्थिक मदत दिली जाते परंतु सन २०१५-१६ पासून गोंदिया जिल्ह्यात एकाही बँकेने शासकीय योजनेकरिता युवकांना कर्ज दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बँकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०४-२०१८) : (१), (२) व (३) नाही.

विविध शासकीय योजनांतर्गत राष्ट्रीयकृत बँकांद्वारे गोंदिया जिल्हयातील युवकांना खालीलप्रमाणे कर्ज वितरण करण्यात आले आहे. सन २०१५-१६ मध्ये एकूण ६५११ लाभार्थ्यांना रुपये ७६७२.०५ लक्ष आणि सन २०१६-१७ मध्ये एकूण ३२०७८ लाभार्थ्यांना रुपये ११४७४.०० लक्ष इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले.

रोजगार हमी योजनेंतर्गत बंद पडलेली रस्त्यांची कामे सुरु करण्याबाबत

(२५) १०१८१२ (२६-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत बंद पडलेली रस्त्यांची कामे तात्काळ सुरु करणे, सन २०१३ मधील अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरी रोजगार हमी योजना अंतर्गत दुरुस्त करणे तसेच नरेगा अंतर्गत रस्त्यांची कामे तात्काळ सुरु करण्याबाबतची मागणी दिनांक १६ मार्च,२०१७ रोजी वा त्यासुमारास वाशिम मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच "तात्काळ कामे सुरु करण्यास सूचना द्याव्यात" असे निर्देश मा.मंत्री, रोजगार हमी योजना यांनी दिले असून मा.मंत्री महोदयांच्या निर्देशाचे पालन न करणारे जिल्हा कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हाधिकारी वाशिम यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (०४-०५-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१३ मधील अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहीरी रोहयो अंतर्गत दुरुस्ती करण्याची मागणी दि.१६ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास वाशिम मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी केली हे खरे आहे.

(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरींचे अंतर्गत दुरुस्तीचे प्रस्ताव गटविकास अधिकारी, तहसिलदार यांचेकडून ज्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले त्याप्रमाणे त्या कामांना मंजूरी देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मा.मंत्री महोदयांच्या निर्देशाचे पालन झाले आहे.

तसेच मजूरांची मागणी लक्षात घेऊन प्राप्त मागणीप्रमाणे प्रथमत: प्रलंबीत असलेली अपूर्ण पांदन रस्त्याची कामे सुरु करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सालेकसा (जि.गोंदिया) येथील तहसिल कृषि विभागातंर्गत ९२ गावात वंचित असलेल्या शेतकऱ्यांसाठी सिंचन सुविधाची योजना कार्यान्वित करण्याबाबत

(२६) १०३६३९ (०३-०१-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) येथील अल्पधारक शेतकऱ्यांसाठी मागेल त्याला बोडी ही योजना शासनाने सुरू केलेली असून तहसिल कृषि विभागातंर्गत सन २०१६-१७ मध्ये ९२ गावात अल्पधारक शेतक-यांना शेतीसाठी सिंचन सुविधाचा लाभ उपलब्ध करून देण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त तालुक्यातील ९२ गावांमध्ये शेतीसाठी पाण्याची योजना तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२६-०३-२०१८) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

"मागेल त्याला बोडी" योजने अंतर्गत गोंदिया जिल्हयातील सालेकसा तालुक्यातील ५० पैसे पेक्षा कमी पैसेवारी असलेल्या १३ गावांमध्ये सदर योजना राबविण्यात येत आहे.

सन २०१६-१७ या आर्थीक वर्षात १३ गावांमधील एकूण २३ शेतकऱ्यांनी या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत. त्यानुसार १७ लाभार्थी पात्र ठरले असुन १३ लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी २ शेतकऱ्यांनी बोडीची कामे पूर्ण केली आहेत. या योजनेची सालेकसा तालुक्यात विविध माध्यमांद्वारे प्रचार- प्रसिध्दी व जनजागृती करण्यात आली आहे.

राज्याची ३८ महामंडळे कायमची बंद करण्यात येणार असल्याबाबत

(२७) १०४८५५ (०७-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा),

श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या प्रमुख ५५ महामंडळापैकी आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेली महामंडळेच सुरू ठेवण्याचे शासनाने ठरविले असून याबाबतचा निर्णय घेण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामंडळांमध्ये कृष्णाखोरे विकास महामंडळ बरखास्त करुन पश्चिम महाराष्ट्रातील खटाव, माण, सांगोला, जत, कवटेमहांकाळ, आटपाडी, खानापूर या दुष्काळी तालुक्यासाठी नवीन प्राधिकरण स्थापन करण्याच्या मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) तसेच नवीन वर्षात शासनाने ३८ महामंडळे बंद करण्याचा निर्णय दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक महामंडळामुळे शासनावर आर्थिक भार पडत असून तोट्यात असलेल्या महामंडळांची मालमत्ता विकून कर्ज फेड केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बंद करण्यात येणारी महामंडळे कोणती व सदरील महामंडळे बंद केल्यास या महामंडळातील कर्मचारी बेरोजगार होणार असल्याने महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता स्वेच्छाधिकार निवृत्तीसारखी योजना लागू करायची वा त्यांना शासनाच्या अन्य विभागात सामावून घेण्यासह सदरील महामंडळाच्या अडचणी सोडवून पुर्नजिवीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१८) : (१) नाही.

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत तोट्यात चालणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य सरकारी कर्मचा-यांच्या विविध मागण्यांबाबत

(२८) १०५२४५ (२८-०३-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ. भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २०१६ पासून ज्याप्रमाणे ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या त्याच धर्तीवर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना त्वरीत सातवा वेतन आयोग लागू करणे, पाच दिवसाचा आठवडा करणे,निवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करणे शासकीय नगरपालिका ग्रामपंचायती व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील तसेच शिक्षक शिक्षकेतर महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजा देणे इत्यादी मागण्या लोकप्रतिनिधीनी तसेच कर्मचारी संघटनेने मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागील सुमारे १ वर्षापासून केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरकारी कर्मचारी, अधिकाऱ्यांना सातवा वेतन आयोग देण्यासंदर्भात राज्य शासनाने जुलै २०१७ मध्ये राज्याचे माजी अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) श्री.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू बक्षी समितीची कार्यकक्षा जुलै २०१७ मध्ये निश्चित करण्यात आल्यानंतर आजमितीस समितीचे कामकाज सुरू केले नसल्याची बाब दिनांक ९ जानेवारी २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे राजपत्रित अधिकारी महासंघाच्या शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०५-२०१८) : (१) होय.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे. राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ चे (बक्षी समिती) प्राथमिक कामकाज सुरुवातीपासून सुरु होते. परंतु राजपत्रित अधिकारी महासंघाच्या शिष्टमंडळाने दि.८ जानेवारी, २०१८ रोजी याबाबत मा.मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते.
(४) सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने शासनाने नियुक्त केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ (बक्षी समिती) चे कामकाज सुरु आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल.

पाच दिवसांचा आठवडा करण्याबाबतचा प्रस्ताव माहे एप्रिल, २०१७ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सादर करण्यात आला असून महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघ व अन्य कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींशी दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत सातवा वेतन आयोग लागू करताना ५ दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत विचार करण्यात येईल असे मा.मुख्यमंत्री यांनी निदेश दिले आहेत.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षाहून ६० वर्षे करणे योग्य होईल किंवा कसे याबाबत अभ्यास करुन सर्वकष अहवाल शासनास सादर करण्याकरीता दि.२४.११.२०१६ च्या शासन निर्णयान्वये श्री.बी.सी.खटुआ (सेवानिवृत्त भा.प्र.से. अधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समिती आपला अहवाल लवकरच शासनास सादर करणार आहे. सदर अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेसंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

"एक देश, एक कर" प्रणाली धोरणानुसार संपूर्ण देश भरात जीएसटी लागू केल्याबाबत

(२९) १०५६११ (२८-०३-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "एक देश, एक कर" प्रणाली धोरणानुसार संपूर्ण देशभरात जीएसटी लागू करण्यांत आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील या कर प्रणालीची अंमलबजावणी करण्यांत येत असताना माहे सप्टेंबर, नोंव्हेबर, डिसेंबर, २०१७ या तीन महिन्यात अपेक्षेपेक्षा जीएसटी कराची कमी वसुली झाल्याने राज्याला १ हजार ६४७ कोटी रु. ची तूट आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कर प्रणाली भरपाई केंद्र शासनाकडून मिळण्याबाबत मागणी केली आहे तसेच केंद्र शासनाने राज्य शासनाला दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजीपर्यंत किती निधी दिला आहे,
(४) असल्यास, निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१८) : (१) होय.
(२) जीएसटीमध्ये अंर्तभूत झालेल्या करांतर्गत सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेला महसूल आधारभूत धरुन त्यावर १४ % वृद्धी लक्षात घेऊन जीएसटी अंतर्गत अपेक्षीत महसूलाची परीगणना करण्यात आली असून, त्यानुसार माहे सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ महिन्यामध्ये अपेक्षेपेक्षा जीएसटी कराची वसुली झालेली नाही.
(३) डिसेंबर २०१७ अखेर केंद्र शासनाकडे रु.१६७२ कोटी मागणी करण्यात आली आहे. डिसेंबर २०१७ अखेर केंद्र शासनाकडून रु.८३४ कोटी नुकसान भरपाई प्राप्त झाली आहे.
(४) निधी प्राप्त झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाच्या खात्यावर पैसे जमा करण्याचे शासनाने दिलेले आदेश

(३०) १०५९७३ (०४-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विकास कामांना गती देण्यासाठी निधीची कमतरता पडत असल्याने नव्याने कर्ज काढण्याची गरज पडत असून, त्यासाठी राज्याच्या तिजोरीत ५० हजार कोटी दाखविणे आवश्यक असल्याने, एमएमआरडीए, म्हाडा, एसआरए, सिडको, एमआयडीसी सारख्या संस्थाना शासनाच्या खात्यात पैसे जमा करण्याबाबत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार कोणी किती पैसे दिनांक १५ जानेवारी, २०१८ अखेर शासनाच्या खात्यावर जमा केले आहेत,

(३) असल्यास,शासनाचे आदेश असतानाही ज्यांनी पैसे जमा केले नाहीत त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

स्पर्धा परीक्षांवरील वस्तू सेवा कर रद्द करण्याबाबत

(३१) १०६४६६ (०७-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको, केंद्र सरकार, बँकाच्या परीक्षांचे अर्ज भरताना १२ टक्के जी.एस.टी. लावण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या बेरोजगार तरुणांना वस्तु-सेवा कराचा मोठा फटका बसला असल्याने या तरुण-तरुणांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर वस्तु-सेवा कर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१८) : (१) सिडको, केंद्र शासन तसेच बँकाच्या परिक्षेचे अर्ज भरताना त्यांनी पुरवठा केलेल्या माहितीपत्रावर १२% जीएसटी (६% एसजीएसटी+६% सीजीएसटी) कराचा दर आहे. वस्तू व सेवा कर प्रणालींतर्गत सिडको, बँक इत्यादी संघटना करपात्र व्यक्तीच्या व्याख्येमध्ये येतात. त्यामुळे त्यांनी परीक्षेसाठी पुरवठा केलेल्या माहितीपत्रकाचा समावेश व्यवसायामध्ये होतो व त्यावर वस्तू व सेवा कराची आकारणी केली जाते.
(२) जीएसटी अंतर्गत कराचा जीएसटीपूर्व काळातील कराच्या भाराइतकाच असल्याने करापोटी किंमतीमध्ये बदल अपेक्षित नाही.

(३) वस्तू व सेवा अधिनियमांतर्गत असलेले कराचे दर जीएसटी कौन्सिलद्वारे निश्चित केले जातात. राज्य शासनाने जीएसटी कौन्सिलने निश्चित केलेले कराचे दर स्विकृत करण्याचे धोरण ठरविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील व्यापाऱ्यांकडून थकीत विक्रीकर वसूल करण्याबाबत

(३२) १०६९४१ (२८-०३-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हजारो व्यापा-याकडे २ हजार ८६० कोटी १८ लाख रूपयांचा विक्रीकर थकीत असून यातील बहुतांश व्यापा-यांनी आपले उद्योग-व्यवसाय बंद करुन पलायन केले असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापाऱ्यांकडील विक्रीकराच्या थकबाकीचा आकडा ३१ मार्च २०१४ ला ४५०० कोटी, ३१ मार्च २०१५ ला ४९७४ कोटी, ३१ मार्च २०१६ ला २८६० कोटींचा असुन या बेपत्ता व्यापाऱ्यांना विक्रीकर विभाग वसुलीसाठी शोधत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ५ लाखापेक्षा अधिक रक्कम थकीत असलेल्या प्रकरणात व्यापा-यांचे अद्यावर बँकखाते व अन्य तपशील प्राप्तीकर खात्यामार्फत माहिती घेऊन फौजदारी गुन्हे दाखल करणार आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ज्या ठिकाणी पूर्वी व्यवसाय होता त्या जागेबाबत तलाठी, तहसिलदार, नगरपालिका, महानगरपालिका, दुय्यम निबंधक खरेदी-विक्री यांच्या अभिलेखाची तपासणी करून विक्रीकर बुडविलेल्या राज्यातील हजारो व्यापा-यांकडून विक्रीकर थकबाकी वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०४-२०१८) : (१) होय. विक्रीकर विभागांतर्गत लापता व्यापाऱ्याकडून दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीची प्रलंबित असलेली वसूली रु.२८६०.१६ कोटी होती.

(२) होय.

(३) वसुली प्रलंबित असलेल्या काही प्रकरणात व्यापारी व्यवसायाचे ठिकाण सोडून गेल्यामुळे व त्याचा नवीन व्यवसायाचा ठावठिकाणा सापडत नसल्याने प्रलंबित थकबाकीची वसूली होण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा ५ लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या सर्व प्रकरणांत आयकर विभागाशी संपर्क साधून प्रलंबित थकबाकीच्या वसूलीसाठी व्यापाऱ्याचे अद्ययावत बँक खाते व इतर तपशील मिळविण्यासाठी विक्रीकर विभाग प्रयत्न करीत आहे.

(४) बेपत्ता व्यापाऱ्यांच्या बाबतीत नजीकचे पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफिस, कंपनी रजिस्ट्रार यांचे अभिलेख, इंटरनेट इत्यादी ठिकाणी तपासणी करुन व्यापाऱ्यांच्या उपलब्धतेबाबत खातरजमा करण्याचे विक्रीकर अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत. तसेच ज्या ठिकाणी अगोदर व्यापाऱ्यांचा व्यवसाय चालू होता, त्या जागेच्या बाबतीत तहसिलदार अथवा तलाठी यांचे अभिलेख, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचा मालमत्ता विभाग तसेच सब रजिस्ट्रार यांचे अभिलेख इत्यादींकडे चौकशी करुन व्यापाऱ्यांचे ठावठिकाणा व मालमत्ता शोधण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने ३५० कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट काढल्याबाबत

(३३) १०७५४५ (०४-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यावर कर्ज असलेल्या ७ लाख ११ हजार कोटी रुपयांच्या व्याजाचा भरणा भारतीय स्टेट बँकेतील खात्यावर जमा करण्यासाठी राज्य सरकारच्या तिजोरीत पैसे नसल्याने ३५० कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट काढावा लागल्याची माहिती माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाला ओव्हर ड्राफट काढण्याची वेळ आली असताना राज्यात मुंबई,नवी मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर या प्रमुख्य शहरांमधील समृध्दी महामार्ग, मेट्रो, ट्रान्सहार्बर लिंक आणि कोस्टल रोड यासारख्या प्रकल्पासाठी सुमारे ३५० लाख कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या तिजोरीवर ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना व जीएसटीमुळे राज्याच्या महसूलात घट झाली असताना समृध्दी महामार्ग, मेट्रो, ट्रान्सहार्बर लिंक आणि कोस्टल रोड यासाठी निधी उभारण्याकरीता शासनाने कोणती तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) जीएसटीची अंमलबजावणी झाल्यानंतर जीएसटी अंतर्गत समाविष्ट झालेल्या करांचा विचार करता गतवर्षीच्या तुलनेत १२% वृध्दी दिसून आली आहे. सदर वृध्दीचा विचार करता जीएसटीच्या अवलंबनानंतर राज्याच्या महसूलात घट झाली असे म्हणता येणार नाही.

सदरच्या प्रकल्पाच्या खर्चाचा भार राज्याच्या अर्थसंकल्पावर येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय सेवेतील ३० टक्के पदे कमी करण्याचा घेतलेला निर्णय

(३४) १०७८२८ (०४-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वित्त विभागाने शासनातील ३० टक्के पदे कमी करुन नवीन आकृतिबंध सादर करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागाना परिपत्रकांद्वारे सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३१ डिसेंबर,२०१७ अखेर किती व कोणकोणत्या विभागाकडून असे अहवाल प्राप्त झाले आहेत तसेच प्रत्येक मंत्रालयीन विभागातील ३० टक्के याप्रमाणे एकूण किती व कोणत्या संवर्गातील पदे कमी होणार आहेत,
(३) असल्यास,शासनाने ३० टक्के पदे कमी केल्यास बेरोजगारीमध्ये वाढ होवून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ३० टक्के पदे कमी करण्याचा निर्णय फेरविचारांती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०५-२०१८) : (१) अंशतः खरे आहे, शासन परिपत्रक दि. १६/०९/१६ अन्वये "प्रत्येक विभागाला आय.टी. सोल्यूशन्सच्या माध्यमातून गतिमानता आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असून आय.टी. सोल्यूशन्सच्या माध्यमातून एकूण मानव संसाधनाची मागणी ३०% पर्यंत खाली आणणे गरजेचे आहे. याकरिता विभागप्रमुखांनी स्वतः लक्ष घाळणे आवश्यक आहे. डेडीकेटेड आय.टी. सल्लागार तसेच, टीम हे करु शकेल. याकरिता विभागाला इन्सेंटीव्ह पण देता येईल", अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ अखेर २९ विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालये यांचे आकृतीबंध सुधारित करण्याचे एकूण९४ प्रस्ताव या विभागास प्राप्त झालेले आहेत.

सरसकट ३० टक्के पदे कमी करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. तथापि सर्व विभागांनी संगणकीकृतमाहिती-तंत्रज्ञानाच्या उपयोगाच्या माध्यमातून कामे गतिमान करण्याने व पर्यायाने मानव संसाधनाची आवश्यकता कमी होणार आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा तालुक्यातील करडी संग्राहक तलाव व मसरूळ येथील पद्मावती धरणातून पाणी उपसा करण्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत

(३५) १०७९६४ (२८-०३-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील लघू पाटबंधारे क्र २ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करण्याचे शासनाचे आदेश असतांना सदर कार्यालय खामगाव येथे स्थलांतरित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बुलढाणा तालुक्यातील करडी संग्राहक तलाव व मसरूळ येथील पद्मावती धरणातून पाणी उपसा करण्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणे कठीण झाले असून हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनापासून बाधित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालय खामगाव येथे हलविण्याचे शासनाचे आदेश निर्गमित केले आहे काय,

(४) असल्यास, करडी संग्राहक तलाव व मसरूळ येथील पद्मावती धरणातून पाणी उपसा करण्याबाबतचे प्रमाणपत्र शेतकऱ्यांना देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१८) : (१) होय.

(२) शासन निर्णय दि.३०.१०.२०१५ अन्वये या प्रकल्पांतर्गतच्या निर्मित लाभक्षेत्रातील सिंचन व्यवस्थापनाची कामे बुलढाणा पाटबंधारे विभागांतर्गत वर्ग करण्यातआली आहेत. तथापि, करडी संग्राहक तलावातून ४१८.१३ हेक्टर क्षेत्रासाठी तर मासरुळ लघु पाटबंधरे प्रकल्पातून एकूण ३१.७७ हेक्टर क्षेत्रासाठी दीर्घ मुदतीचे परवाने अनुक्रमे बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा व लघु पाटबंधारे विभाग क्र.२, चिखली यांचेमार्फत यापूर्वी देण्यात आले आहेत.

(३) जिगांव प्रकल्प पूनर्वसन विभाग, शेगाव हे विभागीय कार्यालय खामगांव येथे स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, विभागीय कार्यालयाचे मुख्यालय स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) बुलढाणा पाटबंधारे विभागाकडून सन २०१७-१८ या वर्षाकरीता अर्जदार शेतकरी व लाभक्षेत्रातील लाभधारकांना हंगामी सिंचनासाठी परवाने देण्यात आले असून या प्रकल्पांतर्गतच्या उर्वरित सिंचन क्षेत्रासाठी दीर्ध मुदतीचे सिंचन परवाने देण्याची कार्यवाही बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांचेमार्फत करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पेट्रोल व डिझेलवर लावण्यात आलेला दुष्काळ उपकर

(३६) १०८२१० (२८-०३-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व पेट्रोल व डिझेल पंपावर ऑक्टोबर २०१५ पासून दुष्काळ सेस म्हणून डिझेल व पेट्रोलवर २ रु. प्रतिलिटर कर आकारला होता तसेच राज्यामध्ये २९ जानेवारी रोजी पेट्रोलचे दर प्रतिलिटर ८० रुपये ७७ पैसे तर डिझेलचा दर प्रतिलिटर ६७ रुपये १८ पैसे इतका झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामध्ये आतापर्यंत अनुक्रमे एप्रिल २०१७ मध्ये प्रतिलिटर रु. ३ ने वाढ व मे २०१७ मध्ये परत प्रतिलिटर रु. २ ने वाढ केली असून राज्य शासनास सन २०१३-१४ मध्ये Vat व Sale Tax च्या रुपाने रु. १९०० कोटी महसूल जमा होत होता तसेच तोच महसुल सन २०१६-१७ मध्ये रु. २३१६० कोटी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील पेट्रोल व डिझेलचे दर सर्वाधिक असून केंद्र शासनाचे विविध कर सर्व राज्यांवर एकसारखेच आहेत पण महाराष्ट्रात अतिरिक्त सेस करामूळे पेट्रोलवर ९ रुपये व डिझेलवर १ रुपये कर आकारला जातो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आतापर्यंत शासनास सदरहू दुष्काळी सेस मधून व Vat व Sale Tax मधून किती निधी जमा झाला असून सदरहु जमा झालेल्या निधीचा विनीयोग कोणत्या विकास कामांसाठी करण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०४-२०१८) : (१) नाही. शासनामार्फत "दुष्काळ सेस" या शिर्षाखाली पेट्रोल व डिझेलवर कराची आकारणी होत नाही. दिनांक १ ऑक्टोबर २०१५ पूर्वी पेट्रोल व डिझेल वरील असलेल्या कराच्या दरामध्ये रु.२ प्रति लिटर वृद्धी करण्यात आली.
(२) पेट्रोल, डिझेल तसेच विमानाच्या इंधन विक्रीतून सन २०१३-१४ मध्ये कर संकलन रु.१५००३ कोटी होते तर सन २०१६-१७ मध्ये कर संकलन रु.१८९७७ कोटी होते.
(३) गुजरात, मध्य प्रदेश, तेलंगणा तसेच आंध्र प्रदेश या शेजारील राज्यापेक्षा महाराष्ट्रातील डिझेलचे दर कमी आहेत.

(४) मूल्यवर्धित करांतर्गत दुष्काळी सेस या नावाने कोणताही कराची आकारणी होत नाही. राज्यामध्ये सद्य:स्थितीत पेट्रोलवरील कराचा दर २६%+९ रु.प्रति लिटर (मुंबई, ठाणे, नवी मुंबई, औरंगाबाद,सोलापूर, नांदेड, नंदुरबार, नागपूर) २५%+९रु.प्रति लिटर तसेच डिझेल वरील कराचा दर २४%+१रु.प्रति लिटर (मुंबई, ठाणे, नवी मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नांदेड, नंदुरबार, नागपूर) २१%+रु. प्रति लिटर आहे. उपरोक्त दर्शविलेल्या कराच्या दराप्रमाणे राज्यात झालेल्या विक्रीवर मूल्यवर्धित कराचे संकलन सन २०१६-१७ मध्ये रु.१८९७७ कोटी तर सन २०१७-१८ मध्ये रु.२२६५२ कोटी झाले. राज्य शासनामार्फत जमा होणारा कराचा महसूल हा राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा होतो व विनियोजन कायद्यानुसार त्याचा विनियोग होतो. त्यामुळे करापोटी प्राप्त झालेला महसूल कोणत्या कामासाठी वापरला गेला असे सांगता येणार नाही.

(५) लागू नाही.

यांत्रिकी विभागाचे उपविभाग कार्यालय - सातवणा (ता.सेलू, जि.जालना) येथून उपविभागीय कार्यालय, आष्टी (जि.बीड) येथे स्थलांतरीत करण्याबाबत

(३७) १०८५२३ (२८-०३-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता कार्यालय, बीड येथे असतानाही केवळ एकच उपविभाग कार्यालय सातवणा (ता.सेलू, जि.जालना) येथे असून या कार्यालयाचे संचालन बीड येथून होत नसल्याने यांत्रिकी विभागाचे उपविभाग कार्यालय - सातवणा येथून उपविभागीय कार्यालय, आष्टी (जि.बीड) येथे स्थलांतरित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक २९ नोव्हेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) सल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने यांत्रिकी विभागाचे उपविभाग कार्यालय - सातवणा, (ता.सेलू, जि.जालना) येथून उपविभागीय कार्यालय, आष्टी (जि.बीड) येथे तातडीने स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१८) : (१) होय.

(२) यांत्रिकी उपविभाग, सातोना, (ता.सेलू, जि.जालना) या उपविभागीय कार्यालयाचे मुख्यालय सातोना येथून आष्टी (ता.आष्टी, जि.बीड) येथे स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कलाप्रकारांवर २८ टक्के कर मानधनावर१८ टक्के लागू
केलेला जीएसटी कर कमी करण्याबाबत

(३८) १०९१११ (०५-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कलाप्रकारांवर २८ टक्के तर मानधनावर १८ टक्के जीएसटी लागू केल्याने "संगीत कलाप्राकर महागले असल्याचे माहे जानेवारी,२०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सर्व कलाप्रकारास ७ टक्के करमणूक कर होता व त्याचा परतावाही मिळत होता परंतु सध्या मात्र शासनाने २८ टक्के जीएसटी लावल्याने १ हजार रुपयांच्या तिकिटाला २८० रुपये जीएसटी भरावा लागत असून उर्वरित ७२० रुपयांमध्ये कार्यक्रम आयोजक संस्थांना कलाकार, स्टेज सजावट, रंगमंच कर्मचारी आदी विविध खर्चामुळे आर्थिक नुकसान होत असल्याने तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी परंपरागत चालत असलेल्या या कलाप्रकाराची जोपासना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१८) : (१) जीएसटी अंतर्गत संगीत कलाप्रकाराच्या तिकीट दरावर १८% (९% सीजीएसटी + ९%एसजीएसटी) कर आकारणी होते. कलाकाराचे मानधन प्रति सादरीकरण रु.१ लक्ष ५० हजार पेक्षा जास्त असल्यास त्यावर १८% जीएसटीची आकारणी होते.

(२) व (३) संगीत कलाप्रकारावर प्रवेश तिकीटाचा रु.२५० प्रति व्यक्ती कर माफी असलेली सूट शासनाने दिनांक २५ जानेवारी, २०१८ पासून रु.५०० प्रति व्यक्ती तिकीटदरापर्यंत वाढविली आहे. त्यामुळे साधारणपणे संगीत कलाप्रकारावर आकारण्यात येणाऱ्या प्रवेश टिकीटावर जीएसटीची आकारणी केली जात नाही. सर्वसाधारण टिकीटावर जीएसटीची करमाफी असल्याने जीएसटीमुळे कार्यक्रम आयोजकास आर्थिक तोटा सहन करावा लागतो असे म्हणता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत होणाऱ्या विकास कामांच्या प्रस्तावांच्या मान्यतेची प्रक्रिया सुलभ करणेबाबत

(३९) ११०१८१ (०४-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत होणाऱ्या विकासकामांच्या प्रस्तावांच्या मान्यतेसाठी विविध स्थानिक संस्थांकडून घेण्यात येणाऱ्या ना - हरकत प्रमाणपत्रांची वैधता केवळ एका महिन्याची असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ना - हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर जिल्हा नियोजन यांच्यामार्फत केली जाणारी प्रक्रिया ही वेळखाऊ असून त्यानुसार ना - हरकत प्रमाणपत्रांची वैध्यता प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यंत समाप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर प्रक्रिया सुलभ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०५-२०१८) : (१) अंशत: खरे आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रभागांकडून देण्यात येणाऱ्या ना-हरकत प्रमाणपत्राची मर्यादा ६० दिवस ते १ वर्ष पर्यंत असते. तथापि, काही प्रभागांकडून प्राप्त होणाऱ्या ना-हरकत प्रमाणपत्राची मुदत ३० दिवसांची असल्याचे आढळून आले आहे. मात्र सदर प्रमाणपत्रावर " वाढीव मुदत आवश्यक असल्यास प्रमाणपत्राची विहित मुदत संपण्यापूर्वी अर्ज सादर करणे आवश्यक आहे," असे नमूद केलेले असते. इतर मंडळ/प्राधिकरण (म्हाडा) कडून दिल्या जाणाऱ्या ना हरकत प्रमाणपत्राची मुदत सर्वसाधारणपणे ३ वर्ष असते.

(२) नाही. तथापि, ना-हरकत प्रमाणपत्र घेणे ही संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची जबाबादारी असते. त्यामुळे सदर प्रमाणपत्राची वैधता संपल्यानंतर ती वाढवून घेण्यासाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा, बृहन्मुंबई महानगरपालिका व संबंधित जमिनीची मालकी असणाऱ्या मंडळ / प्राधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेकडे मागणी करतात. असे प्रस्ताव परत जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडे येत नाहीत.

(३) आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक १२.७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सर्व समावेशक मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ३.१४ अन्वये, "मा. लोकप्रतिनिधींकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत प्रस्तावित केलेली कामे तातडीने पूर्ण व्हावीत म्हणून त्या कामासाठी आवश्यक असलेले हमीपत्र/ना-हरकत प्रमाणपत्र स्थानिक स्वराज्य संस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयास/कार्यान्वयीन यंत्रणाना त्वरीत उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी", अशी तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जीवनावश्य वस्तूंचे दर नियंत्रणात आणण्याबाबत

(४०) ११२१६० (०४-०४-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक बाजारात खनिज तेलाच्या किंमतीत मोठयाप्रमाणात दरवाढ झाल्यामुळे राज्यात त्याचा परिणाम होवून महागाई मोठया प्रमाणात वाढली असून वित्तीय तुटीवरही त्याचा परिणाम झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील सर्वसामान्य जनता जीवनाश्यक वस्तुंच्या भाववाढीमुळे त्रस्त झाली आहे, हे ही खरी आहे काय,

(३) असल्यास, जीवनाश्यक वस्तुंचे दर नियंत्रणात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०५-२०१८) : (१) हे खरे नाही. शासनाचे प्राप्त महसूल व शासनाने ठरविलेल्या विविध लोककल्याणकारी योजनामुळे काही प्रमाणात वित्तीय तूट झाली आहे. सन २०१७-१८ करीता रु.१५ हजार ३७५ कोटी वित्तीय तूट आहे.

(२) हे खरे नाही, एकूण २५ जीवनावश्यक वस्तूंचा नाशिक, पुणे, नागपूर, मुंबई या ठिकाणचा घाऊक व किरकोळ दरांचा दैनंदिन अहवाल केंद्र शासनास नियमितपणे सादर केला जातो. दिनांक १७.०४.२०१८ रोजी केंद्र शासनास सादर केलेल्या अहवालावरुन असे स्पष्ट होते की, मागील ६ महिन्यांच्या तुलनेत डाळी, कांदे,टोमॅटो, वांगी, कोबी या जीवनावश्यक वस्तूंचे किरकोळ दर कमी झाले आहेत. तर खाद्यतेले, गहू, तांदूळ, बटाटा यांचे किरकोळ दर काही प्रमाणात वाढले आहेत. साखर, गूळ, दूध यांचे किरकोळ दर स्थिर आहेत. एकंदरीत जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रित असल्याचे दिसून येते.

(३) सद्य:स्थितीत, केंद्र शासनाने दिनांक २७.०९.२०१७ च्या अधिसूचनेन्वये खाद्यतेल व खाद्यतेल बिया या जीवनावश्यक वस्तूंवर दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत. त्यास अनुसरून, राज्य शासनाने दिनांक ०८.१२.२०१७ आदेशान्वये राज्यात सोयाबीन वगळून खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तूंवर दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत.

राज्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ व काळाबाजार प्रतिबंध तसेच जीवनावश्यक वस्तूंचा सुरळीत पुरवठा अधिनियम, १९८० अंतर्गत नियमितपणे कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत क्षेत्रिय कार्यालयांना शासन पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

भविष्यात तूर/तूरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बीया व इतर कडधान्य यांच्या वाढीव किंमती नियंत्रीत करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतचा कृति आराखडा तयार करण्यासाठी, दिनांक २८.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दर नियंत्रक समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका घेऊन, जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

नांदेड जिल्हयातील लिंबोटी धरण क्षेत्रातील विविध पदे रिक्त असल्याबाबत

(४१) ११३०११ (३१-०३-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील लिंबोटी धरण क्षेत्रातील ३ इंजिनियरसह ६६ कर्मचा-यांची गरज असतांना केवळ ५ कर्मचारी आहेत तसेच कंधार उर्ध्व मनार, पेठवडज या तीन शाखेअंतर्गत १२८ कर्मचा-यांची गरज असतांना केवळ १९ कर्मचा-यांवर कारभार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२९-०५-२०१८) : (१) व (२) सद्य:स्थितीत नांदेड जिल्हयातील लिंबोटी धरण क्षेत्र तसेच कंधार उर्ध्व मनार, पेठवडज शाखेअंतर्गत पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, जलसंपदा विभागाच्या सुधारीत आकृतीबंध मंजूरीबाबतची कार्यवाही अंतीम टप्प्यात असून सुधारीत आकृतीबंधास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर रिक्त पदे भरण्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर करुन कर्जमाफीची रक्कम देण्याबाबत

(४२) ११३१४९ (१०-०४-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर करुन कर्जमाफीची रक्कम देण्यासाठी शासनाने ठाणे जिल्ह्याच्या विकास निधीत गेल्या वर्षीच्या ३०६ कोटी रुपयांऐवजी यावर्षी २३० कोटी रुपये म्हणजे सुमारे ७५ टक्के कपात करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेकडून घोषित करण्यात आलेल्या अनेक महत्वाच्या योजना प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जिल्ह्याच्या विकास निधीत वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठीची तरतूद करतांना जिल्हा वार्षिक योजना वा राज्याच्या इतर कार्यक्रम खर्चाच्या योजनांच्या निधीमध्ये कोणतीही कपात करण्यात आलेली नसून यासाठी स्वतंत्ररित्या तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. राज्याच्या योजनांच्या आकारमानाच्या अनुषंगाने जिल्हा वार्षिक योजनेसाठी द्यावयाचा निधी निश्चित झाल्यानंतर तो विहीत कार्यपध्दती अवलंबून नियोजन विभाग, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागामार्फत त्यांच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात जिल्हा निहाय स्वतंत्र मागणी खाली निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो.

तसेच राज्याच्या अर्थसंकल्पात समाविष्ठ करण्यात आलेला अनिवार्य व कार्यक्रम खर्चासाठी निधी वितरीत करतांना मागील वर्षाच्या खर्चाचा कल व वर्षभरामध्ये टप्प्या-टप्प्याने प्राप्त होणारा महसूल तसेच वर्षभरात अचानक उद्भवणारा अनपेक्षित / तातडीचा खर्च याबाबी विचारात घेऊन वेळावेळी निधी वितरणाची मर्यादा निश्चित करण्यात येते. त्यानुषंगाने सन २०१७-१८ या वर्षात वेळोवेळी अर्थसंकल्पीत केलेला निधी (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम तसेच केंद्र पुरस्कृत योजनेचा व त्यानुरुप राज्य हिस्स्याचा निधी वगळता), महसूली ७०% व भांडवली ८०% या मर्यादेत वितरीत करण्याच्या सूचना दि. ३०.६.२०१७ च्या परिपत्रकान्वये संबंधित प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या होत्या. मात्र, दिनांक १.२.२०१८ च्या परिपत्रकान्वये जिल्हा वार्षिक योजनांच्या (सर्वसाधारण / अनुसूचित जाती घटक / अनुसूचित जमाती घटक कार्यक्रम) १००% तरतूदी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे जिल्हा योजनेच्या निधीत कपात वा वाढ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडुन करण्यात येत असलेली वार्षिक योजनेतील कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्याबाबत

(४३) ११३१६८ (२८-०३-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन समितीने तयार केलेल्या वार्षिक आराखड्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता बंधनकारक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा वार्षिक योजनेतील कामे सुचविताना स्थानिक लोकप्रतिनिधींची शिफारशी विचारात घेतल्या जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा नियोजन समिती मार्फत वार्षिक योजनेतील कामे या पुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडुन करुन घेण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडुन करण्यात येत असलेली वार्षिक योजनेतील कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०४-२०१८) : (१) नाही. महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील कलम १० मधील तरतूदीनुसार जिल्ह्यातील पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेऊन, एकत्रित करुन, जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसूदा तयार करण्याचे आणि सदर मसूद्याच्या मान्यतेसाठी राज्य शासनाकडे शिफारस करण्याचे कार्य जिल्हा नियोजन समितीकडून केले जाते.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येणा-या ज्या जिल्हास्तरीय योजनांची कार्यान्वयीन यंत्रणा जिल्हा परिषद आहे, अशा जिल्हास्तरीय योजनांचा वार्षिक आराखडा जिल्हा परिषदेने तयार करुन जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे. जिल्ह्याकरीता उपलब्ध एकूण निधी मर्यादेच्या प्रमाणात जिल्हा परिषदेने तयार केलेला वार्षिक आराखडा विचारात घेऊन जिल्ह्याच्या वार्षिक विकास आराखड्यात त्याचा समावेश करण्याचे कार्य जिल्हा नियोजन समितीने करणे अपेक्षित आहे.
(२) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येणा-या जिल्हास्तरीय योजनांच्या सर्व कार्यान्वयीन यंत्रणाकडून योजनानिहाय व कामनिहाय वार्षिक आराखडे जिल्हा नियोजन समितीकडे येणे अपेक्षित असल्याने वार्षिक आराखड्यात कामे समाविष्ट करण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय योजनांच्या संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांची आहे.
(३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येणा-या ज्या जिल्हास्तरीय योजनांच्या शासननिर्णयानुसार कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे अशा जिल्हास्तरीय योजनेतील सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होणे अपेक्षित आहे.
(४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येणा-या ज्या जिल्हास्तरीय योजना शासननिर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत अशा जिल्हास्तरीय योजनेतील सर्व कामे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून होणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील दादर-प्रभादेवी परिसरातील गैमन इंडिया प्रा.लि. या खासगी कंपनीने केंद्र शासन व राज्य शासनास देय असलेल्या वेगवेगळ्या करांची रक्कम थकविल्याबाबत

(४४) ११३६७८ (०७-०४-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर-प्रभादेवी परिसरातील गैमन इंडिया प्रा.लि. या खासगी कंपनीने केंद्र शासन व राज्य शासनास देय असलेल्या वेगवेगळ्या करांचे ५५९६.८० करोड रुपये दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने सरकारी व खासगी बँकाकडून ९४७२.०० करोड रुपये कर्ज घेऊन त्यांची फसवणूक केली असून कंपनीत कार्यरत असलेल्या कामगारांची तसेच अधिकाऱ्यांची वेतन देयके सुध्दा दिलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी भांडूप परिक्षेत्राचे आमदार यांनी दि.०५/०२/२०१८ रोजी मा.मुख्यमंत्री आणि मा.महसूल मंत्री यांच्याकडे तक्रारवजा निवेदन देऊन चौकशी करण्याची तसेच कंपनीची १५००.०० करोड रुपयांची संपत्ती जप्त करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त कंपनीची संपत्ती जप्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) : (१) राज्य शासनाची विक्रीकराची थकबाकी गॅमन इंडिया प्रा.लि.या कंपनीकडे खालीलप्रमाणे आहे:-

सन	थकबाकी (रु.)	
२००५-०६	१०२१७२५	अपील स्टे
२००९-१०	९५४७५७१	हफ्ते सवलत आहे
२०११-१२	६९८९१७७	हफ्ते सवलत आहे
एकूण	१७५५८४७३	

केंद्र शासनाची विविध कराची थकबाकीची माहिती केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

(२) सदर कंपनीने सरकारी व खाजगी बँकांकडून किती कर्जे घेतली आहेत याची एकत्रित माहिती मिळणे कठीण आहे कारण बँकाकडील कर्जाची एकत्रित माहिती राज्य शासनाकडे उपलब्ध नसते तर प्रत्येक बँकेकडे असते.

(३) या प्रकरणी भांडूप परीक्षेत्राचे मा.आमदार यांचे दि.०३.०२.२०१८ रोजीचे मा.महसूलमंत्री यांच्याकडे तक्रारवजा निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(४) राज्य शासनाच्या विक्रीकर थकबाकी संदर्भातील माहिती खालीलप्रमाणे आहे.

सन	थकबाकी (रु.)	
२००५-०६	१०२१७२५	अपील स्टे
२००९-१०	९५४७५७१	हफ्ते सवलत आहे

२०११-१२	६९८९१७७	हफ्ते सवलत आहे
एकूण	१७५५८४७३	

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयात उर्वरित वैधानिक विकास मंडळाकडून मंजूरी दिलेल्या व अपूर्ण राहिलेल्या कामांना निधी मिळण्याबाबत

(४५) ११३७१८ (०४-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात उर्वरित वैधानिक विकास मंडळाकडून सन २००८-२००९ व सन २००९-१० व सन २०१०-११ या वर्षात मंजूरी दिलेल्या व अपूर्ण राहिलेल्या कामाना निधी मिळण्यासाठी दिनांक २६ फेब्रुवारी,२०१५ रोजी नंतर केलेल्या निधीच्या मागणीच्या संदर्भात जिल्हा प्रशासनाकडून माहिती मागितलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर माहितीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) नियोजन विभागाव्दारे सदर प्रकरणाची जिल्हाधिकारी, कोल्हापूर कडून प्राप्त माहितीच्या आधारे तपासणी करण्यात आली. त्यानुसार शासनाकडून जिल्हाधिकारी, कोल्हापूर मार्फत निधी वितरित झालेला नसतानाही जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी काही कामांना सुरूवात केली असल्याचे निदर्शनास आले.

नियोजन विभागाचे दिनांक २४ जुलै, २००९ रोजीच्या शासन निर्णयातील सूचनेनुसार फक्त मंजूर कामांकरिता प्रत्यक्ष निधी वितरित झाल्यानंतरच सुरूवात करणे अपेक्षित होते.

यास्तव, सदरहू कामांकरिता जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना आता कोणताही निधी देय होत नाही. तसेच, विकास मंडळांना मा. राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार सन २०११-२०१२ या वर्षापासून (सन २०१४-२०१५ वगळता) 'विशेष निधी' शासनाद्वारे उपलब्ध करून देण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयाचे व्हिजन २०२२ च्या प्रस्तावाबाबत

(४६) ११४०१३ (०९-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्याचे व्हिजन २०२२ राज्य शासनाकडे सादर करण्याकरिता प्रत्येक विभागाने लोकप्रतिनिधीना विश्वासात घेऊन प्रस्ताव तयार करून माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर सादर करण्याच्या सूचना मा.पालकमंत्री, कोल्हापूर जिल्हा यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०५-२०१८) : (१) होय.
जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१८-१९ चा प्रारुप आराखडा हा "New India of २०२२" च्या पार्श्वभूमीवर निती आयोगाकडून देण्यात आलेल्या सूचनांनुसार तयार करण्यात आलेल्या, जिल्ह्यांच्या "व्हिजन/रिझोल्युशन डॉक्युमेंट" अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या, १० ते १५ महत्वाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असावा व ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहाय्यभूत असावा, या सूचनांच्या अनुषंगाने "कोल्हापूर जिल्ह्याचे व्हिजन २०२२" राज्य शासनाकडे सादर करण्याकरीता जिल्ह्यातील सर्व कार्यरत शासकीय यंत्रणांनी लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन, तो तयार करुन माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर सादर करण्याच्या सूचना मा.पालकमंत्री, कोल्हापूर यांनी दिनांक ०६.१२.२०१७ च्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेत दिल्या होत्या.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुद्रा लोन वितरीत करताना अर्जदारांना विमा काढण्याची सक्ती होत असल्याबाबत

(४७) ११४१११ (०४-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा जिंतूर (जि.परभणी) चे शाखा मार्फत मुद्रा लोन करिता अर्जदाराकडून एस.बी.आय.बँकेची विमा सरंक्षण पॅलिसी काढण्यास सक्तीबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थानिक नागरिकांने जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०५-२०१८) : (१) होय.
(२) जिल्हा अग्रणी बँकेमार्फत सर्व बँकांना मुद्रा लोन मंजूर करताना विमा पॉलिसी न काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील रोजगार निर्मितीसाठी स्थापन केलेल्या ॲक्शन रुम मंत्रालयामध्ये उस्मानाबाद जिल्हयाचा समावेश न केल्याबाबत

(४८) ११४७४० (०९-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दारिद्रय निर्मुलनासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या सहकार्याने देशातील पहिले ॲक्शन रुम मंत्रालय स्थापन करण्यात आलले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या झालेल्या असल्याने उस्मानाबाद जिल्हयाचा त्यामध्ये समावेश होणे आवश्यक आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, पहिल्या टप्प्यात निवडलेल्या २७ तालुक्यामध्ये उस्मानाबाद जिल्हयातील तालुक्यांचा समावेश केला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

मानव विकास कार्यक्रमामधीलच १३ जिल्हयातील निवडक २७ तालुक्यांमध्ये रोजगार निर्मितीच्या योजना राबविण्यासाठी "Action Room to Reduce Poverty" हा नियंत्रण कक्ष संयुक्त राष्ट्र (United Nations) च्या सहकार्याने स्थापन करण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत शिक्षण, आरोग्य व बालकल्याण व उत्पन्नवाढीच्या योजना राबविण्यात येत आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील दारिद्ररेषेखालील कुटुंबांचे प्रमाण या दोन निर्देशांकाच्या आधारे राज्यातील ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर व गडचिरोली या २३ जिल्हयांतील १२५ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. "Action Room to Reduce Poverty" या 'नियंत्रण कक्ष' अंतर्गत त्यापैकी १३ जिल्हयांतील निवडक २७ तालुक्यांची निवड रोजगार निर्मितीविषयक योजना राबविण्यासाठी करण्यात आली आहे. तथापि उस्मानाबाद जिल्हयाचा समावेश मानव विकास कार्यक्रमामध्ये नसल्याने "Action Room to Reduce Poverty" हा 'नियंत्रण कक्ष' स्थापन करतेवेळी या १३ जिल्हयांमध्ये उस्मानाबाद जिल्हयाचा समावेश करण्यात आलेला नाही.

चंद्रपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथे स्थानिक आगरी, आदिवासी बांधवाच्या जमिनी बेकायदेशीरपणे बळकावून अनधिकृत इमारती बांधण्यात आल्याबाबत

(४९) ११४८३९ (१२-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथे स्थानिक आगरी, आदिवासी बांधवाच्या जमिनी बेकायदेशीरपणे बळकावून अनधिकृत इमारती बांधण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) : (१) व (२) तत्कालीन वसई-विरार उपप्रदेशात विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत असलेल्या शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे अशा प्रकारची लेखी तक्रार आढळून आली नाही. तथापि, वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे माहे सप्टेंबर, २०१७ ते माहे एप्रिल, २०१८ या कालावधीत २० तक्रारी आढळून आल्या आहेत.

या तक्रारींच्या अनुषंगाने ६ इमारती, ४५ रुम, ६७ प्लिंथ व २ आर.सी.सी. प्लिंथ इतकी बांधकामे तोडण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिका अनधिकृत बांधकामांवर नियमितपणे निष्कासनाची कारवाई करीत असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर सह ८ जिल्ह्यातील उपविभागीय कार्यालये (जलसंपदा) एकत्रित करण्याचा घेतलेला निर्णय

(५०) ११५५१६ (१२-०४-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर सह ८ जिल्ह्यातील उपविभागीय कार्यालये (जलसंपदा) एकत्रित करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने घेतल्याने कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधूदुर्ग जिल्ह्यातील धरणांची देखभाल व सुरक्षेचा प्रश्न याबाबत सदरील कार्यालये स्थलांतरीत करू नये यासाठी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ८ जिल्ह्यांमध्ये ६ मोठे ७ मध्यम व २० लघु प्रकल्पांवर पुणे येथून नियंत्रण ठेवणेबाबत व तसेच उपअभियंता ते गट ड चे कर्मचारी यांचेपर्यंत या सर्वांत हस्तांतरीत करण्यासह कोल्हापूर सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधूदुर्ग जिल्ह्याचे कार्यालये एकत्रीत आणावयाची असतील तर पेठ नाका जिल्हा सांगली या मध्यवर्ती ठिकाणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२३-०५-२०१८) : (१) होय.

(२) मुख्य द्वार उभारणी विभागीय पथक क्र.३, पुणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्राच्या दृष्टीने पुणे येथील कार्यालयाचे मुख्यालय वारणा वसाहत, पेठ नाका, जिल्हा सांगली या मध्यवर्ती ठिकाणी स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.